**“ऑगस्ट २०२१” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक २ ऑगस्ट २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या सहायक विक्रीकर आयुक्त, गट-अ या संवर्गातील ४ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक ३ ऑगस्ट २०२१ च्या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय सेवा तसेच केंद्रीय नागरी सेवेतील अधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्य शासनाकडे प्रतिनियुक्तीने नियुक्ती व पदस्थापना देण्यासंदर्भातील धोरण निश्चित करण्यात आले आहे.
- दिनांक ६ ऑगस्ट २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या जिल्हाधिकारी, गट-अ या संवर्गातील ८ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक ९ ऑगस्ट २०२१ च्या शासन पत्रान्वये केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या दिनांक २२ जुलै २०२१ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये दिनांक १ जुलै २०२१ पासून लागू करण्यात आलेली ११% महागाई भत्त्यातील दरवाढ व तरतुदी महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील निवृत्तवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनाही लागू राहतील. त्यानुसार महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना दिनांक १ जुलै २०२१ पासून २८% दराने महागाई भत्ता अनुज्ञेय राहिल.
- दिनांक १० ऑगस्ट २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ या संवर्गातील एका परिविक्षाधीन अधिकाऱ्याचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक १० ऑगस्ट २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-अ या संवर्गातील एका परिविक्षाधीन अधिकाऱ्याचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक १८ ऑगस्ट २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-अ या संवर्गातील एका परिविक्षाधीन अधिकाऱ्याचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक १८ ऑगस्ट २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम- रजांबाबतचे धोरण याबाबत सूचना दिल्या आहेत.
- दिनांक २० ऑगस्ट २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ करिता वनामती नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३६-सहायक अनुदाने (वेतन) या बाबीखाली जुलै २०२१ च्या वेतनाकरिता रु.५,३१,३७०/- इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.
- दिनांक २४ ऑगस्ट २०२१ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतुदीतून राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे / ६ विभागीय व ३६ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना प्रशासकीय प्रशिक्षणाकरिता (प्रशिक्षण शुल्क) सन २०२०-२१ करिता ऑनलाईन व ऑफलाईन झालेल्या प्रशासकीय प्रशिक्षण खर्चाकरिता प्रशिक्षण शुल्क दरानुसार एकूण रु.९४.४६ लाख प्रशासकीय प्रशिक्षण खर्चापैकी रु.८५.२१ लाख वजा करुन करुन उर्वरित रु.९.२५ लाख इतका निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २५ ऑगस्ट २०२१ च्या शासन निर्णयान्वये सन २०१८ पूर्वी विहित कालावधीत रुजू न झालेल्या मंत्रालयीन सरळसेवा संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांची सेवाज्येष्ठता त्यांना रुजू होण्यासाठी मुदतवाढ आदेशात नमूद केलेल्या तरतुदीनुसार राहिल.
- दिनांक २६ ऑगस्ट २०२१ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील ३१५ अस्थायी पदे दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २६ ऑगस्ट २०२१ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा तत्त्वावर नियुक्त्या जलदगतीने होण्यास सहाय्यभूत म्हणून अनुकंपा नियुक्तीची प्रमाणित कार्यपद्धती (SOP) प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- दिनांक २७ ऑगस्ट २०२१ च्या शासन निर्णयान्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी कर्यालयाच्या आस्थापनेवरील २४ अस्थायी पदे दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**(ख) प्रशिक्षण / परीक्षा**

- दिनांक ६ ऑगस्ट २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण व परीक्षा सन २०२१ करिता दिनांक २० ऑगस्ट २०२१ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे.

**(ग) नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याचे नियतवाटप करण्यात आले आहे.
- २५ अवर सचिवांना उपसचिव संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.
- ५८ कक्ष अधिकाऱ्यांना अवर सचिव संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.
- १३१ सहायक कक्ष अधिकाऱ्यांना कक्ष अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.
- १३३ लिपिक-टंकलेखकांना सहायक कक्ष अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.
- एका शिपायाला लिपिक-टंकलेखक संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.

**(घ) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- भारतीय प्रशासन सेवेतील १४ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- २८ सह / उपसचिव, ५१ कक्ष अधिकारी, २ सहायक कक्ष अधिकारी, २ निवडश्रेणी लघुलेखक, ८ लिपिक-टंकलेखक अशा ९१ अधिकारी / कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.
- १ उपसचिव, १ अवर सचिव, १ कक्ष अधिकारी, १ सहायक कक्ष अधिकारी अशा ४ अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.
- १ सहसचिव, २ कक्ष अधिकारी अशा ३ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- १ उपसचिव, ३ अवर सचिव, १ कक्ष अधिकारी अशा ५ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- २ उपसचिव, १ उच्चश्रेणी लघुलेखक अशा ३ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.
- ३ सहायक कक्ष अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.

**(च) ज्येष्ठतासूची**

- दिनांक १० ऑगस्ट २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- श्री.अ.पं.इप्पर, सहायक कक्ष अधिकारी यांची सेवा ज्येष्ठता सुधारित करण्यात आली आहे.

*****